# मुंबई विद्यापीठ

<u>अत्यंत महत्वाचे</u>

क्र.नि.वि./आयसीडी २०१६-१७/ 82 /२०१६

दिनांक :- 12 मे, २०१६

डॉ (श्रीमती) सुधा मोहन (अध्यक्षा)
प्राध्यापक,
राज्यशास्त्र विभाग,
मुंबई विद्यापीठ, कालिना,
विद्यानगरी, सांताक्रूझ (पू),
मुंबई - ४०० ०९८.

प्रा. सुहास पळशीकर
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ,
गणेशखिंड,
पुणे - ४११ ००७.

डॉ. [illegible]
सोनोपंत दांडेकर आर्टस,
व्हि. एस. आपटे वाणिज्य आणि
एम. एच मेहता सायन्स महाविद्यालय,
पालघर (प),
ता. व जिल्हा - पालघर -४०१ ४०४

डॉ. बी. व्यंकटेशकुमार
प्राध्यापक,
राज्यशास्त्र विभाग,
मुंबई विद्यापीठ, कालिना,
विद्यानगरी, सांताक्रूझ (पू),
मुंबई - ४०० ०९८.

प्रा. ए. एम. ओक,
प्राध्यापक,
जे.एस.एम. कला, वाणिज्य व
विज्ञान महाविद्यालय,
लिमये वाडी,
अलिबाग - ४०२ २०१.

महोदया/महोदय,

महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार, वर्ष १ अंक ३१(५), दिनांक १७ ऑगस्ट, २०१५ च्या अधिनियम क्रं. २९ आणि पत्र क्रं. मविस-२०१५/(११२/१५)/विशि-४, दिनांक २५ ऑगस्ट, २०१५ नुसार विद्यापीठांच्या विविध प्राधिकरणांच्या निवडणुका दिनांक ३१ ऑगस्ट, २०१६ पर्यंत पुढे ढकलण्यात आल्या असल्याने महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ च्या कलम ३७(२)(बी), ३७(३)(ए)(बी)(सी)(डी) आणि ३७(४) मधील तरतूदीनुसार अभ्यास मंडळ स्थापन करता आलेले नाही.

आपणास कळविण्यास आनंद होत आहे की, मा. कुलगुरूंनी स्थापन केलेल्या मुंबई विद्यापीठाच्या **<u>राज्यशास्त्र</u> (<u>POLITICS</u>) या तदर्थ अभ्यासमंडळावर**, आपले सदस्य म्हणून नामनिर्देशन केले आहे. सदर तदर्थ अभ्यास मंडळावर झालेल्या आपल्या नामनिर्देशनाबद्दल, मी विद्यापीठ प्रशासनातर्फे, आपले हार्दिक अभिनंदन करीत आहे.

आपल्या सदस्यत्वाची मुदत तात्काळ प्रभावाने सुरु होऊन पुढील आदेश प्राप्त होईपर्यंत कलम ४३, ४४ आणि ४८(२)(संलग्न)मधील तरतुदींच्या अधिन राहून असेल.

आपल्या सक्रीय सहभागाची व मार्गदर्शनाची अपेक्षा व्यक्त करतो.

आपला विश्वासू,

(डॉ. एम. ए. खान)
कुलसचिव

# मुंबई विद्यापीठ

**निवडणूक विभाग**

क्र.नि.वि./आयसीडी १६-१७/ ५९३ /२०१७

दिनांक ९ मार्च,२०१७

प्रति,

विविध विषयांच्या अभ्यासमंडळ कार्यगटावरील सर्व सदस्य,
विद्याशाखांचे समन्वयक आणि विद्याशाखा कार्यगटावरील सर्व सदस्य,
विविध विषयांच्या संशोधन व मान्यता कार्यगटावरील सर्व सदस्य,
विद्यापीठ अध्यापन व संशोधन कार्यगटावरील सर्व सदस्य.

महोदय/महोदया,

महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार, वर्ष १ अंक ३१(५), दिनांक १७ ऑगस्ट, २०१५ चा अधिनियम क्रं. २९ नुसार विद्यापीठाच्या विविध प्राधिकारणाच्या तसेच अभ्यासमंडळांच्या निवडणूका दिनांक ३१ ऑगस्ट, २०१६ पर्यंत पुढे ढकलण्यात आल्या असल्याने महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ च्या विविध कलमाअंतर्गत अभ्यासमंडळ, विद्याशाखा, संशोधन व मान्यता समिती आणि विद्यापीठ अध्यापन व संशोधन समिती गठीत करता आलेली नाही.

मात्र विद्यार्थ्यांचे नुकसान होऊ नये याकरीता दिनांक १९ नोव्हेंबर, २०१५ रोजीच्या विद्वत परिषदेमध्ये बाब क्रं. ९.६ अन्वये पारीत झालेल्या ठरावानुसार आणि महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ मधील कलम १४(७) अन्वये कुलगुरूंना प्रदान केलेल्या अधिकारानुसार मा. कुलगुरूंनी विविध अभ्यासमंडळ, विद्याशाखा, संशोधन व मान्यता आणि विद्यापीठ अध्यापन व संशोधन याकरीता विशेष कार्यगट गठीत केले आहेत.तसेच विविध विद्याशाखांकरीता समन्वयकांची नेमणूक करण्यात आली आहे.

उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे पत्र क्र. मसाविअम-२०१५/(३१९/१५)/विशि-४/भाग-२ दिनांक १ मार्च, २०१७द्वारे महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ दिनांक १ मार्च, २०१७ पासून अंमलात आणण्याचे निश्चित केले आहे.

या अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, मा. कुलगुरूंनी दिनांक ७ मार्च, २०१७ रोजीच्या क्र.नि.वि./आयसीडी/१६-१७/५०९/२०१७ टिपण्णी नुसार पुढील आदेश प्राप्त होईपर्यंत सध्या आपण कार्यरत असलेल्या विविध विषयांच्या अभ्यासमंडळ, विद्याशाखा, संशोधन व मान्यता आणि विद्यापीठ अध्यापन व संशोधन कार्यगटाला सलगता देण्यात आली असल्याने आपले सदर कार्यगटावरील सदस्यत्व (अध्यक्ष/समन्वयक/सदस्य) कायम राहील.

आपला विश्वासू,

डॉ. एम. ए. खान
(कुलसचिव)